लोकमत

# कठोर मेहनतीने 'वैभव'शाली बना!

क्रीडा विश्वातून



सुनील वालावलकर
क्रीडा संघटक

**वैभवने त्याचे वय चोरले असेल किंवा नसेल; परंतु त्याने आणि त्याच्या पालकांनी अफाट मेहनतीने भवितव्य सुरक्षित केले हे मान्यच करावे लागेल. तथापि, वैभवच्या पालकांनी जे कष्ट त्याच्यासाठी घेतले, त्याच प्रकारचा ताण प्रत्येक पालकांनी स्वीकारण्याची गरज नाही...**




**अवघ्या** १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आयपीएलमध्ये केवळ ३५ चेंडूंत शतक झळकावून क्रिकेटप्रेमींचे मनं जिंकली. खरोखरंच, त्याची ती खेळी नयनरम्य होती. समस्तीपूरच्या (बिहार) वैभवने क्रिकेटमध्ये नवा विक्रम प्रस्थापित केला आणि क्रीडाविश्वातील जुन्या वादाने डोकं वर काढले. खेळाडूंची वयचोरी! न्यूझीलंडचा माजी कर्णधार स्टीफन फ्लेमिंगने वैभवच्या हाडांची चाचणी करण्याची मागणी करून वैभवच्या यशावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ज्याप्रकारे बंदी असलेल्या मादक पदार्थाचे सेवन हा एक क्रीडा क्षेत्राला लागलेला कलंक आहे, तसेच खेळाडूंची वयचोरी हे देखील क्रीडा क्षेत्राचे जुने दुखणे आहे. यश मिळविण्यासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी असलेल्या या काळात क्रीडा क्षेत्रातील या गुन्ह्यांकडे क्षमाशील नजरेने पाहिले जाते, हे गंभीर आहे.

याबाबतीत, ज्येष्ठ क्रिकेट प्रशिक्षक नागेश ठाकूर म्हणतात की, 'वयचोरी हा प्रकार क्रिकेटच नाही, तर कोणत्याही खेळासाठी नवा नाही. मुंबई शालेय क्रिकेटमध्ये असे प्रकार सर्रास घडतात, पण काही खेळाडू आपल्या गुणवत्तेच्या जोरावर पुढे आले हेही खरे आहे. खेळाडूंचे खरं वय जाणून घेण्यासाठी मुंबई क्रिकेटमध्ये हाडांची चाचणी करण्यासही सुरुवात झाली, पण यामध्ये काही शाळांनी अफरातफर करून त्यातही चोरी केली. जिथे बनावट जन्मदाखला, बनावट आधारकार्ड बनू शकते, तिथे बनावट हाडांची चाचणी करून घेणे कठीण नाही. ॲथलेटिक्समध्येही असे प्रकार होतात आणि यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर आपण मागे पडतो. पोईसर जिमखान्याचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी यांनी सांगितले की, '''बॅडमिंटनसारख्या खेळात १२-१४ वर्षाखालील मुलांना कमी वयोगटात खेळविले जाते. यामध्ये प्राथमिक जबाबदारी ही प्रशिक्षकांची असते. महत्त्वाचे म्हणजे, हा मार्ग प्रशिक्षक स्वत: सुचवितो. तसेच, या प्रकाराबाबत पालकांना काहीच माहिती नसते आणि मुले अजाण असतात. अनेक प्रशिक्षक स्वार्थासाठी, आपले नाव मोठे करण्यासाठी खेळाडूंना अशा चुकीच्या मार्गाने खेळवितात. त्यामुळे वयचोरीबाबत प्रशिक्षकांची जबाबदारी अधिक असते.

वैभवने त्याचे वय चोरले असेल किंवा नसेल; परंतु त्याने आणि त्याच्या पालकांनी अफाट मेहनतीने भवितव्य सुरक्षित केले हे मान्यच करावे लागेल. तथापि, वैभवच्या पालकांनी जे कष्ट त्याच्यासाठी घेतले, त्याचप्रकारचा ताण प्रत्येक पालकांनी स्वीकारण्याची गरज नाही, असे मला वाटते. कारण, वैभवची कामगिरी अपवादात्मक आहे. अव्वल दर्जाचा खेळाडू होण्यासाठी शारीरिक किंवा मानसिक प्रगल्भता येण्यासाठी १४ हे वय नक्कीच नाही. कारण, वैभवच्या या यशाने हुरळून बरेच पालक आज आपल्या पाल्यावर बराच ताण टाकू लागले आहेत. त्यांना आपल्या पाल्याद्वारे नवा सचिन तेंडुलकर घडवायचा आहे, पण असे काही करण्याची गरज नाही. मुलांना त्यांच्या वेगाप्रमाणे वाढू द्यावे.